**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**गुरुवार दिनांक २४ सप्टेंबर २०२६**

**ठळक बातम्या**

1. **दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना मदतीचा आदेश उद्याच काढणार - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस.**
2. **विविध प्रकारच्या खाद्य तेलांवरच्या आयात शुल्कात कपात, तेलाच्या किंमती कमी होण्याची शक्यता.**
3. **राज्याची मंत्रिमंडळ उपसमिती दुष्काळसदृश स्थितीचा प्रत्यक्ष आढावा घेणार असल्याची महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळेंची माहिती.**
4. **नागपुरात बाप्पाच्या विसर्जनासाठी पोलीस प्रशासन अलर्ट मोडवर.**

------------------------------

मुख्यमंत्री दौरा

अमरावती विभागातील दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना तातडीने मदत देण्यासाठी दुष्काळ संहितेतील ट्रिगर एकनुसार मदतीचा आदेश उद्याच काढण्यात येईल, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली आहे. वाशिम जिल्ह्यातील दुष्काळग्रस्त भागाची पाहणी केल्यानंतर अमरावती विमानतळावर प्रसारमाध्यमांशी बोलताना त्यांनी ही माहिती दिली.

***(होल्ड बाईट- मुख्यमंत्री 26 सेकंद)***

केंद्राच्या मदतीची प्रतीक्षा न करता राज्य सरकारकडून तातडीने मदत देण्यात येईल. केंद्राकडून मदतीसाठी आवश्यक पंचनामे आणि इतर प्रक्रिया पूर्ण करून प्रस्ताव पाठवण्यात येईल, असं मुख्यमंत्र्यांनी सांगितलं. येत्या काळात चाराटंचाई आणि पाणीटंचाईवर उपाययोजना, तसंच अन्नधान्याची मदत करण्यात येणार आहे. विद्यार्थ्यांच्या शिक्षणात खंड पडू नये यासाठीही थेट मदत केली जाईल. उपलब्ध पाण्यावर रब्बीची पिकं घेण्यासाठी शेतकऱ्यांना मदत करण्यात येईल.रोजगार निर्मितीसाठी जलसंधारणाच्या कामांना प्राधान्य दिलं जाणार असून, आटलेल्या जलसाठ्यांमधील गाळ काढणे, जलसाठ्यांच्या दुरुस्तीची कामं आणि आवश्यक ठिकाणी जलसाठा संरचना उभारण्याची कामं हाती घेण्यात येतील.शेतकऱ्यांना देण्यात येणारी मदत दिवाळीपूर्वी मिळेल, याचं नियोजन करण्यात येणार असल्याचं

मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितलं. कर्जमाफीची रक्कम शेतकऱ्यांच्या खात्यात जमा होत असून, कर्जमाफी मिळालेल्या शेतकऱ्यांना नियमानुसार बँकांनी कर्ज उपलब्ध करून द्यावं, असंही त्यांनी स्पष्ट केलं. दरम्यान, वाशिम जिल्ह्यातील दुष्काळसदृश परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्र्यांनी आज म्हसला, मोहगव्हाण आणि जऊळका येथे शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन पिके आणि पाणी परिस्थितीची पाहणी केली.यावेळी त्यांनी नुकसानग्रस्त सोयाबीन आणि तूर पिकांची पाहणी करून शेतकऱ्यांशी संवाद साधला.

------------------------------

उद्धव ठाकरे

राज्यातल्या दुष्काळसदृश परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर सरकारनं तातडीनं किमान २ ते ३ दिवसांचं विधिमंडळाचं अधिवेशन घ्यावं आणि या परिस्थितीत काय पावलं उचलली जात आहेत, याची माहिती द्यावी, अशी मागणी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते उद्धव ठाकरे यांनी मुंबईत वार्ताहर परिषदेत केली. कार्यकर्त्यांनी ग्रामीण भागांत शेतकऱ्यांसाठी मदत केंद्रं सुरू करावीत, असं आवाहन त्यांनी केलं. शेतकऱ्यांचे प्राण कंठाशी आलेले असताना दुष्काळ जाहीर करण्यासाठी ५ ऑक्टोबरपर्यंत वाट पाहायचं कारण काय? कोणते निकष आणि कोणाची वाट सरकार पाहात आहे, असा प्रश्नही त्यांनी उपस्थित केला.

------------------------------

खाद्य तेल

केंद्र सरकारनं विविध प्रकारच्या खाद्य तेलांवरच्या मूलभूत आयात शुल्कात कपात केली आहे, त्यामुळं तेलाच्या किंमती कमी होण्याची शक्यता आहे. कच्चा सूर्यफुल तेलावर आता १० ऐवजी शून्य टक्के, कच्च्या सोयाबीन तेलावर आणि कच्च्या पाम तेलावर आता १० ऐवजी ५ टक्के मूलभूत आयात शुल्क लागेल. या दरकपातीचा लाभ सर्व ग्राहकांना मिळेल यासाठी सर्व खबरदारी घेण्याचे आदेश केंद्रीय ग्राहक व्यवहार मंत्रालयानं खाद्यतेल उद्योगातल्या सर्व कंपन्यांना दिले आहेत.

------------------------------

सेवा संकल्प

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या राजकीय कारकीर्दीला २५ वर्षं पूर्ण होत आहेत. 'जनसेवेतून देशसेवा हा मंत्र आणि सतत समर्पणभावाचा' हा प्रवास आहे. सेवा आणि सुशासन या दोन सूत्रांचा अवलंब करत २०४७पर्यंत विकसित भारताचं उद्दिष्ट साकार करण्यासाठी सरकार सातत्यानं काम करत आहे. सर्वसमावेशक विकास आणि

सामाजिक सक्षमीकरणाच्या माध्यमातून नागरिकांच्या जीवनात आमूलाग्र बदल घडत आहेत. या विशेष वृत्त मालिकेत आज आपण ऐकणार आहोत  स्टार्ट अप इंडीया अभियानासंदर्भात

*(व्हॉइस कास्ट - मेधा )*

***स्टार्टअप इंडिया अभियानामुळे देशातील स्टार्टअप परिसंस्थेला मोठी चालना मिळाली असून, मार्च २०२६ पर्यंत उद्योग आणि अंतर्गत व्यापार प्रोत्साहन विभाग-डीपीआयआयटीकडे नोंदणीकृत स्टार्टअपची संख्या 2 लाखांहून अधिक झाली आहे. या स्टार्टअप्सनी २३ लाखांहून अधिक थेट रोजगार निर्माण केले आहेत.२०१६ मध्ये सुरू झालेल्या स्टार्टअप इंडिया अभियानाचा उद्देश भारताला नोकरी शोधणाऱ्या देशापासून नोकऱ्या निर्माण करणाऱ्या, नवोन्मेष आणि समस्यांचे निराकरण करणाऱ्या देशात रूपांतरित करणे हा होता. सुरुवातीला सुमारे 400 नोंदणीकृत स्टार्टअप्सपासून सुरू झालेला हा प्रवास आता भारताला जगातील तिसरी सर्वात मोठी स्टार्टअप परिसंस्था बनवण्यापर्यंत पोहोचला आहे.स्टार्टअप्सचा विस्तार आता केवळ बंगळुरू, मुंबई आणि दिल्लीपुरता मर्यादित राहिलेला नाही. जवळपास ५० टक्के मान्यताप्राप्त स्टार्टअप्स टियर-टू आणि टियर-थ्री शहरांमधून येत आहेत.शालेय स्तरावरही नवोन्मेषाला चालना देण्यासाठी देशभरात दहा हजारांहून अधिक अटल टिंकरिंग लॅब्स स्थापन करण्यात आल्या असून, 1 कोटी 10 लाखांहून अधिक विद्यार्थी त्यात सहभागी झाले आहेत.महिला उद्योजकांचाही स्टार्टअप क्षेत्रातील सहभाग वाढला आहे. मार्च २०२६पर्यंत एक लाखांहून अधिक मान्यताप्राप्त स्टार्टअप्समध्ये किमान एक महिला संचालक किंवा भागीदार होत्या.दरम्यान, मागील महिन्याच्या 16 तारखेला हैदराबादस्थित स्कायरूट एरोस्पेस या स्टार्टअपने 'विक्रम-१' हे भारतातील पहिले खासगीरित्या विकसित कक्षीय रॉकेट प्रक्षेपित केले. यामुळे खासगी कक्षीय प्रक्षेपण क्षमता असलेल्या देशांमध्ये भारताचा समावेश झाला आहे.***

------------------------------

चंद्रशेखर बावनकुळे

पावसाच्या अभावाचा फटका बसलेल्या भागात उपाययोजना निश्चित करण्यासाठी नेमलेली ११ सदस्यीय मंत्रिमंडळ उपसमिती प्रत्यक्ष स्थितीचा आढावा घेणार असल्याचं महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सांगितलं. नागपूरमधे आज ते वार्ताहरांशी बोलत होते. दर मंगळवारी उपसमितीची बैठक होणार असल्याचं ते म्हणाले. राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दलाच्या मदतीसाठी आवश्यक प्रस्ताव केंद्रसरकारकडे पाठवू, मात्र त्याकरता वाट न पाहता राज्यसरकार आपल्या पातळीवर

उपाययोजना सुरु करेल असं महसूलमंत्र्यांनी सांगितलं. पीकविम्यासंदर्भात विमा कंपन्याबरोबर चर्चा करुन शेतकऱ्यांनी विम्याचा लाभ अधिकाधिक मिळवून देण्याचा प्रयत्न करण्याचं आश्वासन त्यांनी दिलं.महसूल प्रशासन गतिमान करण्यासाठी अपर जिल्हाधिकाऱ्यांची ११ पदं निर्माण करण्यात येणार असल्याची माहिती त्यांनी दिली. नागपूरसह पंढरपूर आणि बारामतीसाठीही अपर जिल्हाधिकारी देण्यात आले आहेत. आज २१ अपर जिल्हाधिकाऱ्यांना प्रमुख जबाबदाऱ्या देण्यात आल्याचे बावनकुळे यांनी सांगितले.

------------------------------

विसर्जन

नागपूर शहरातील १ हजार ७०२ सार्वजनिक आणि २ लाख ४ हजार घरगुती गणपतींचे विसर्जन होणार असून, त्यासाठी पोलीस प्रशासनाने कडक सुरक्षा व्यवस्था तैनात केली आहे.विसर्जन मिरवणुकीदरम्यान अनुचित प्रकार टाळण्यासाठी तसेच वाहतूक आणि गर्दीचे नियोजन करण्यासाठी शहर यंत्रणा सज्ज झाली आहे.२५ आणि २६ सप्टेंबर रोजी रात्री ८ ते १२ वाजेपर्यंत शहरात जड वाहनांना प्रवेशबंदी लागू करण्यात आली आहे.अशी माहिती नागपूरचे पोलीस आयुक्त विश्वास नांगरे पाटील यांनी आज दिली.मुर्ती विसर्जन व्यवस्थेसंदर्भात बोलतांना त्यांनी सांगितल की......

***(होल्ड बाईट - विश्वास नांगरे पाटील 44 सेकंद)***

दरम्यान, नागपूर शहरातील २२५ ठिकाणी उभारण्यात आलेल्या ४४७ कृत्रिम विसर्जन कुंडांच्या परिसरात अखंड वीजपुरवठा राखण्यासाठी महावितरणने विशेष पथके तैनात केली आहेत.

------------------------------

आशियाई क्रीडा स्पर्धा

जपानमधील आयची-नागोया आशियाई क्रीडा स्पर्धेच्या आजच्या दिवसाची सुरुवात वुशूमध्ये रोशिबिना देवीच्या रौप्यपदकाने झाली. महिलांच्या ६० किलो'सांडा' प्रकारात रोशिबिना देवीने रौप्यपदक पटकावलं. भारत या स्पर्धेत भारत १५ पदकांची कमाई करूनपदकतालिकेत १३व्या स्थानावर आहे. यात १ सुवर्ण, ६ रजतआणि ८ कांस्य पदकांचा समावेश आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती सी.पी. राधाकृष्णन,पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आशियायी क्रीडा स्पर्धेत वेगवेगळ्या क्रीडाप्रकारात यश मिळवणाऱ्या खेळाडूंचं अभिनंदन केलं आहे.

------------------------------

हवामान

हवामान! पुढील काही तासात नागपूर, चंद्रपूर, गोंदिया, गडचिरोली, यवतमाळ येथे तुरळक ठिकाणी हलक्या पावसाची शक्यता हवामान खात्याने वर्तवली असून आज नागपूर गोंदिया गडचिरोली आणि यवतमाळ येथे अतिवृष्टीचा ऑरेंज अलर्ट तर वर्धा भंडारा अमरावती अकोला बुलढाणा, वाशिम  येथे यलो अलर्ट देण्यात आला आहे तर उद्या भंडारा, गोंदिया आणि चंद्रपूर येथे अतिवृष्टीचा ऑरेंज अलर्ट तर उर्वरित विदर्भात यलो अलर्ट घोषित करण्यात आला आहे.

-------------------------------